# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**13.04.2025** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

- राज्यपाल शिफारसित विधेयकांवर राष्ट्रपतींनी तीन महिन्यांच्या कालवधीत निर्णय घ्यावेत - सर्वोच्च न्यायलयाकडून निर्देश.
- पंतप्रधान उद्या हरियाणात हिसार ते अयोध्या विमान सेवेचा प्रारंभ करणार
- रोझ व्हॅली पाँझी घोटाळ्यातल्या गुंतवणूकदारांना दिलासा, अर्थ मंत्रालयाकडून पाचशे कोटी रुपयांहून अधिक निधी
- अमेरिकेद्वारे नव्या करांमधून स्मार्टफोन, संगणकांना सवलत आणि
- तिरंदाजी विश्वकरंडकाच्या पहिल्या टप्प्यात मिश्र सांघिक स्पर्धेत भारतीय संघाला सुवर्णपदक

**राज्यपाल राष्ट्रपती न्यायालय**

राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी राखीव ठेवलेल्या विधेयकांवर तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा असे निर्देश काल सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांच्याकडून दहा प्रलंबित विधेयकांना मान्यता रोखण्याचा निर्णय रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती महादेवन यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले आहेत. या कालावधीपेक्षा अधिक विलंब होत असल्यास संबंधित राज्याला त्याची वैध कारणे दिली पाहिजेत असेही खंडपीठाने म्हटले आहे. निर्धारीत काळात कारवाई न केल्यास राज्यांना न्यायालयांमध्ये जाण्याचा तसेच रिट मॅन्डमस म्हणजेच कायदेशीर कर्तव्याला बाध्य करणारा आदेश मागण्याचा अधिकार असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे. याविषयीचा सविस्तर निर्णय काल न्यायालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

**मोदी हरयाणा दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आंबेडकर जयंतीनिमित्त हरियाणाला भेट देणार आहेत. सर्वप्रथम ते हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेला हिरवा झेंडा दाखवतील आणि हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी करतील. हिसार इथं पंतप्रधान एका जाहीर सभेलाही संबोधित करणार आहेत. त्यानंतर, यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज प्रकल्पाच्या 800 मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज युनिटची ते पायाभरणी करतील. शेवटच्या टप्प्यापर्यंत वीज पोहोचवण्याचं या प्रकल्पाचं उद्दिष्ट असून या प्रदेशातील पायाभूत सुविधांना यामुळे चालना मिळणार आहे. भारतमाला परियोजनेअंतर्गत सुमारे 170 कोटी रुपये किमतीच्या सुमारे

साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही मोदी करतील. यामुळे दिल्ली ते नारनौल प्रवासाचा वेळ सुमारे एक तासाने कमी होईल आणि प्रदेशातील उद्योगधंद्याना चालना मिळेल.

**मुर्शिदाबाद हिंसा**

पश्चिम बंगालमध्ये मुर्शिदाबाद जिल्ह्यातील काही भागात वक्फशी संबंधित हिंसाचारात तीन जण ठार झाले आणि अठरा पोलिस कर्मचारी जखमी झाले.वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात मुर्शिदाबाद जिल्ह्यातल्या सुती, समशेरगंज, जलंगी, लालगोला आणि धुलियान येथे काल हिंसाचार उसळला. कायद्याला विरोध करताना अनेक ठिकाणी घरे, दुकाने, सरकारी मालमत्ता आणि पोलिस वाहने जाळण्यात आली. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी पश्चिम बंगालचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांच्यासमवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन चर्चा केली. राज्यातली परिस्थिती तणावपूर्ण असली तरीही ती नियंत्रणात असल्याचं महासंचालकांनी सांगितलं. यामध्ये दीडशे लोकांनी अटक करण्यात आली असून, स्थानिक पातळीवर सीमा सुरक्षा दलाची मदत घेत असल्याचंही महासंचालकांनी स्पष्ट केलं. राज्य सरकारच्या विनंतीनुसार अतिरिक्त पाच तुकड्या तैनात करण्यात आल्याचं केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी सांगितलं.

**अमित शहा रायगड**

छत्रपती शिवाजी महाराजांकडून संपूर्ण देशाला, जगाला प्रेरणा मिळत आहे, त्यांना केवळ महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका असं आवाहन केंद्रिय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं  आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या 345 व्या पुण्यतिथीनिमित्त काल शहा यांनी रायगडावर महाराजांना आदरांजली वाहिली त्यावेळी ते बोलत होते. केंद्र सरकार शिवाजी महाराजांच्या दृष्टीकोनाचं निष्ठापूर्वक पालन करत आहे आणि भारताला जगासाठी आशेचा किरण बनवण्याच्या उद्देशानं अथक प्रयत्न करत आहे असं शहा यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. त्यानंतर संध्याकाळी शहा मुंबईत गुजराती साप्ताहिक 'चित्रलेखा'च्या 75 व्या स्थापना दिन सोहळ्याला उपस्थित होते.  'चित्रलेखा'चा 75 वर्षांचा प्रवास गुजराती साहित्य, समाज, जीवनशैली आणि गुजरात आणि देशासमोरील समस्यांचा आरसा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**वेव्हज**

मुंबईत 1 ते 4 मे 2025 दरम्यान होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या पूर्वसंध्येला आयोजित रेझोनेटः द ईडीएम चॅलेंजसाठी सर्वोत्कृष्ट 10 स्पर्धकांची नावं काल माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं भारतीय संगीत उद्योग संस्थेच्या सहयोगानं जाहीर केली. यामध्ये राज्यातल्या 7 स्पर्धकांचा समावेश आहे. हे स्पर्धक आता वेव्हज् च्या जागतिक मंचावर आपली कला सादर करतील. इलेक्ट्रॉनिक संगीत निर्मिती आणि डीजे या क्षेत्रातील उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन आणि पाठबळ देणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

**रोझ व्हॅली**

पश्चिम बंगालमध्ये रोझ व्हॅली पोंझी घोटाळ्यामुळे नुकसान झालेल्या लाखो गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी अर्थ मंत्रालयाकडून मोठं पाऊल उचलण्यात आलं आहे. गुंतवणुकादारांना दिलासा देण्यासाठी अर्थ राजमंत्री पंकज चौधरी यांनी मालमत्ता विल्हेवाट समितीचे अध्यक्ष डी. के सेठ यांना पाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिक

निधी सुपूर्द केला आहे. या पैशांमुळे घोटाळ्यातील साडेसात लाख बाधित व्यक्तींना पैशांची परतफेड करता येईल. या समितीकडे 31 लाखांहून अधिक दावे दाखल करण्यात आले आहेत. पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम आणि त्रिपुरामध्ये सक्तवसुली संचालनालयाकडून आर्थिक अफरातफर प्रतिबंधक कायद्यांतर्गत रोझ व्हॅली ग्रुपविरुद्ध पाच वेगवेगळ्या प्रकरणांची चौकशी केली जाते आहे.

**अमेरिका कर**

अमेरिकेने नव्याने जाहीर केलेल्या करांमधून स्मार्टफोन आणि संगणक यांना सवलत देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या जकात आणि सीमा सुरक्षा विभागाने दिलेल्या सुचनांनुसार, अमेरिकेत आयात होणाऱ्या या दोन्ही वस्तूंसाठी बहुतेक देशांसह चीनला देखील अतिरिक्त करातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फायदा सेमीकंडक्टर, सोलर सेल आणि मेमरी कार्डसह इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि घटक यामध्ये होणार आहे.

**भारत अफ्रिका सराव**

आफ्रिका खंडातील देश आणि भारत यांच्यादरम्यान बहुस्तरीय सागरी सरावाला आजपासून टांझानियामध्ये प्रारंभ होणार आहे. सहा दिवस हा सराव सुरू राहील. सर्वसाधारण प्रादेशिक सागरी आव्हानांवर सहकार्यातून उपाय विकसित कऱण्याचा उद्देश यामागे आहे. भारतीय नौदलाची जहाजे आयएनएस चेन्नई, आयएनएस केसरी आणि आयएनएस सुनयना या सरावात सहभागी होणार आहेत.

**सुदान यादवी**

सुदानमधून अरबेतर मस्सलित लोकांना नामशेष करण्यासाठी तिथल्या रॅपिड सपोर्ट फोर्सेसना मदत केल्याचा आरोप संयुक्त अरब अमिरातीनं फेटाळून लावला आहे. सुदानच्या सशस्त्र दलांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर अमिरातीवर हा आरोप केला आहे. सुदानमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुदान लष्कर आणि रॅपिड सपोर्ट फोर्सेसदरम्यान सुरु असलेल्या यादवी युद्धात आतापर्यंत हजारो लोकांचा मृत्यु झाला तर सव्वाकोटी लोक बेघर झाले आहेत. या युद्धातील बंडखोरांना आपण मदत करत नाही, उलट संयुक्त राष्ट्रांना सहकार्य करत चाड आणि दक्षिण सुदानमध्ये लक्षावधी डॉलर्सची मदत आणि रुग्णालयं उभारुन दिली असल्याचं युएईनं म्हटलं आहे.

**झारखंड  नक्षल**

झारखंडममध्ये पश्चिम सिंहभूम जिल्ह्यात जराईकेला पोलिस स्थानकांतर्गत सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान कोब्रा आणि झारखंड जग्वार दलाचे दोन जवान गंभीर जखमी झाले आहेत. कोब्रा बटालियन, सीआरओएफ, झारखंड जग्वार आणि चाईबासा पोलिस दलाचे संयुक्त शोध अभियान अद्याप सुरू आहे.

दरम्यान, लातेहार जिल्ह्यात नक्षलवाद्यांविरुद्ध पोलिस दलाने केलेल्या दुसऱ्या शोध मोहिमेत माओवादी संघटनेच्या दोन सबझोनल कमांडरसह सहा नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त कुमार गौरव यांनी माध्यमांना माहिती दिली.

**तिरंदाजी**

अमेरिकेत फ्लोरिडा इथं तिरंदाजी विश्वकरंडक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात संयुक्त मिश्र सांघिक स्पर्धेत, ज्योती सुरेखा वेन्नम आणि ऋषभ यादव या जोडीनं सुवर्णपदकाला गवसणी घातली. काल रात्री झालेल्या या सामन्यात चीनी तैपेच्या जोडीला 153 विरुद्ध 151 गुणांनी पराभूत केलं.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल लखनऊ सुपर जायंटस् आणि गुजरात टायटन्स यांच्यात लखनऊ इथं झालेला सामना सुपर जायंटस् संघानं सहा गडी राखून जिंकला. विजयासाठीचं 181 धावांचं लक्ष्य पार करताना जायंटस् संघानं 20 षटकांत 4 गडी बाद 186 धावा केल्या. हैदराबाद इथं पंजाब किंग्ज आणि सनरायजर्स हैदराबाद संघांमध्ये झालेल्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादनं 245 धावांचं लक्ष्य 18 षटकं आणि तीन चेंडूत, 8 गडी राखून गाठलं आणि पंजाब किंग्जवर विजय मिळवला, अभिषेक शर्मा 55 चेंडूत 141 धावा करून सामनावीर ठरला.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**